स्थायी समिती
दाखल विषय – दि. ५/१/२०२१

विषय क्रमांक :– ९३९ त्वर्य

मा.सौ.सुनिता गलांडे, मा.सौ.मानसी देशपांडे, मा.महेंद्र पठारे, मा.श्रीमती लताताई राजगुरु, मा.प्रमोद ओसवाल, मा.सौ.वर्षा तापकीर, मा.श्रीमती अमृता बाबर, मा.सौ.उज्ज्वला जंगले व मा.कु.हिमाली कांबळे यांचे दि.१२/१/२०२१ चे पत्र.

कोविड १९ च्या साथीच्या महामारीने जे महानगरपालिकेतील अधिकारी, कर्मचारी दिवंगत झालेले आहेत अशा सर्वांच्या वारसांना र.रुपये २५ लाख देण्यास मान्यता द्यावी.

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्रमांक :– ९४० त्वर्य

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९५ नुसार सन २०२१–२०२२ चे पुणे महानगरपालिकेचे महसूली, भांडवली इ. उत्पन्न व खर्चाचा आराखडा (‘अ‘ व ‘क‘) संदर्भांकित क्र. १ च्या महानगरपालिका मुख्य सभा ठरावानुसार दि. १५ जानेवारी अगर तत्पुर्वी सादर करणे आवश्यक आहे. परंतू काही अपरिहार्य कारणामुळे सदरचा अंदाजपत्रक आराखडा दि.२९/१/२०२१ रोजी सकाळी ११:३० वा. सादर करणेत येणार असून तसेच त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यक्रम निश्चित करण्यास व याबाबत यापुर्वी झालेल्या मा.मनपा मुख्य सभा ठराव क्र. ३४९ दि.४/१०/१९८३ चा दुरुस्त करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुले/५७७ दि.११/१/२०२१ चे पत्र.

| | | |
|---|---|---|
| १) | सन २०२१–२२ साठी मा.महा.आयुक्त यांनी अंदाजपत्रक आराखडा (अ व क) सादर करणे | २९ जानेवारी २०२१ अगर तत्पूर्वी |
| २) | सन २०२१–२२ चे अंदाजपत्रकाबाबत स्थायी समितीत अंतिम निर्णय घेणे | ५ फेब्रुवारी अगर तत्पुर्वी |
| ३) | सन २०२१–२२ साठीचे स्थायी समितीने तयार केलेले अंदाजपत्रक मा.सभासदांना देणे | २४ फेब्रुवारी अगर तत्पुर्वी |

विषय क्रमांक :– ९४१ त्वर्य

सन २०१९-२० या वर्षात वितरीत केलेल्या मोफत/सवलतीचे बसपासपोटी PMPML संस्थेस र.रु.२१,७७,१६,६६९/- आदा करणेस, तसेच त्यापैकी यापूर्वीच उचल स्वरुपात आदा करण्यात आलेले र.रु.२० कोटी समायोजित करून उर्वरित र.रु.१,७७,१६,६६९/- PMPML संस्थेस RE58A101B या अर्थशीर्षकातून आदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/५८२ दि. ११/१/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ९४२ त्वर्य

मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेत्या यांचे दि. १२/१/२०२१ चे पत्र.

कोरोनाच्या पार्श्वभुमीवर आपण खालील सर्व कर्मचा-यांना ४५ दिवसांकरीता एकवट मानधन तत्वावर कामावर रुजु करण्यात आले होते. त्यामध्ये वैदयकीय अधिकारी, निवासी आरोग्य अधिकारी, आरोग्य निरीक्षक , सहायक दवाखाना, हिवताप निरीक्षक, आया , औषध निर्माता, परिचारक, परीचालिका, कक्ष सेवक म्हणून एकवट मानधन तत्वावर काम करणारे सर्व कोविड योद्धा म्हणून पुणे महानगरपालिकेचा आरोग्य विभागाच्या कोविड सेंटर, स्वाब सेंटर , दवाखाना येथे सेवा करीत होते. कोरोना सारख्या महामारी च्या काळात मध्ये या सर्व कर्मचा-यांनी जीव धोक्यात घालून प्रामाणिकपणे कार्य करत होते. तसेच कोरोनाचा प्रादुर्भाव जरी कमी झाला असला तरी कोरोना पुर्णपणे गेला नाही आहे. तसेच नविन कोरोनाही उद्धभवला आहे व अश्या परिस्थितीत व भविष्यात या सर्व कर्मचा-यांची गरज भासणार आहे. पुढील काही दिवसांत शासनाच्या वतीने कोविड १९ वॅक्सीनची लसीकरण सुरु होणार आहे व या उपक्रमासाठी या सर्वांची गरज भासणार आहे. तरी सर्व वरील कर्मचा-यांना ६ महिन्यांकरीता एकवट मानधन तत्वावर कामावर रुजु करण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– ९४३ त्वर्य
मा.अरविंद शिंदे व मा.श्रीमती लताताई राजगुरु यांचे दि.११/१/२०२१ चे पत्र.

हेल्पलाईन स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था, मर्या. विश्वास आधार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या व श्री. सदगुरू शंकर महाराज माहिला उन्नती संस्था, दिप किरण ग्राहक सहकारी संस्था, पुणे या चार संस्था सहकार तत्वावर चालविण्यात येणाऱ्या रजिस्टर्ड संस्था असून या संस्थामधून अनेक गोरगरीब महिला व गरजू लोकांना रोजगार उपलब्ध होतो.

तरी वरील संस्थेप्रमाणे उन्नती स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित, पुणे या संस्थेस शासन निर्णय २००२ नुसार विविध सवलती देऊन क्षेत्रिय कार्यालयास र.रू. ३ लाखापर्यत लागणाऱ्या सेवा व वस्तु घेण्यासाठी काम विना निविदा काढण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– ९४४ त्वर्य

पुणे महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामे/धोक्याची बांधकामे उतरविणे व इतर विविध कामे करण्यासाठी गॅसकटर व कॉम्प्रेसर विथ ब्रेकर यांच्या सहाय्याने ठेकेदारामार्फत काम करुन घेणे (बांधकाम विकास विभाग झोन क्रमांक १ ते ७) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार संकल्प इन्फ्रास्ट्रक्चर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४२,३३,१५२/– पेक्षा २१.०१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३३,४३,७६६=७६५ होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास अधिक पूगप मधील जी.एस.टी. (१८%) अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/अतिक्रमण/५६५ दि. ६/१/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ९४५ त्वर्य

पुणे मनपाच्या येरवडा हॉट मिक्स प्लान्टमार्फत पावसाळा कालावधीमध्ये शहरातील विविध रस्त्यांवर खड्डे दुरुस्ती करणे कामाकरीता कोल्ड मिक्स मालाचा पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.ब्लॅक गोल्ड ट्रेडर्स अॅन्ड डिस्ट्रीब्युटर प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४७,६०,०५०/– पेक्षा अॅटपार दराने) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४७,६०,०५०/– पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये २,३८,००२=५० पर्यंत काम करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/५६६ दि. ७/१/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ९४६ त्वर्य

कचरा डेपोमुळे पिण्याचे पाणी दुषित झालेल्या उरुळी देवाची व शेवाळवाडी येथे दैनंदिन खेपा टँकरने पाणीपुरवठा करणे (२०२०–२१) (भाग ३) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एन.वाय.शिवरकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पु.ग.प. र.रु. ९९,९५,२९०/– पेक्षा ८.००१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ९१,९५,५६६=८४ रकमेपर्यंत काम करून घेणेसाठी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/५६९ दि. ८/१/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ९४७ त्वर्य

पुणे मनपाचे ढकलगाडे आवश्यकतेनुसार मटेरियलसह दुरुस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.पायल इंडस्ट्रिज, पुणे व मे.गुरुसाई एंटरप्रायजेस यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४५,००,०००/– पेक्षा ५% ने कमी) असल्याने मे.पायल इंडस्ट्रिज, पुणे यांचेकडून र.रु. ३०,६३,७५०/– व मे.गुरुसाई एंटरप्रायजेस यांचेकडून र.रु. १२,११,२५०/– या प्रमाणे एकूण र.रुपये ४२,७५,०००/– पर्यंत जी.एस.टी. व इतर खर्चासह करणेस व त्याकामी त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ई) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/५७१ दि. ८/१/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ९४८ त्वर्य

हडपसर मुंढवा क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत प्रभागामध्ये टँकरने पिण्याचे पाणी पुरवठा करणे सन २०२०–२१ (भाग २) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार रवि फुडस अॅन्ड बेव्हरेजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुगप र.रु. ३९,९९,६००/– पेक्षा ५.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३७,९९,६२०/– रकमेचे काम करून घेणेसाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/५७० दि. ८/१/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ९४९ त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या कै.चंदूमामा सोनावणे प्रसुतिगृह पुणे-४२ येथे पुणे मनपा बरोबर संयुक्त विदयमाने खाजगी संस्था/चॅरीटेबल ट्रस्ट/स्वंयसेवी संस्था यांचेमार्फत डायलेसिस प्रकल्प ५ वर्षे मुदतीच्या कराराने चालविण्यास देणे **कामी** एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट (स्वारस्य प्रस्ताव ) मागविणेत आले असता आलेल्या तीन प्रस्तावापैकी पात्र प्रस्तावधारक इको सेल्स या प्रस्तावधारकानी जाहिर प्रकटनातील अटीशर्तीनुसार कागदपत्रांची पूर्तता केल्याने त्यांचेबरोबर करारनामा करणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/५७३ दि. ११/१/२०२१ चे पत्र.

१. इको सेल्स , शॉप नंबर ४ स.नं.५१७, ज्ञानदा हौसिंग सोसायटी,ज्ञानप्रबोधिनी जवळ सदाशिव पेठ, पुणे-४११०३० यांचेकडून कै.चंदूमामा सोनावणे प्रसुतिगृह भवानी पेठ,पुणे येथील तळमजल्यावरील अंदाजे क्षेत्रफळ १२० चौ.मी. जागेमध्ये डायलेसिसचा संयुक्त प्रकल्प राबविणेस,

२. कै.चंदूमामा सोनावणे प्रसुतिगृह भवानी पेठ,पुणे येथील डायलेसिस प्रकल्पाकरीता दरमहाचे वीज व पाणीपुरवठयाची देयके इको सेल्स , शॉप नंबर ४ स.नं.५१७, ज्ञानदा हौसिंग सोसायटी,ज्ञानप्रबोधिनी जवळ सदाशिव पेठ,पुणे-४११०३० यांनी अदा करणेस,

३. इको सेल्स , शॉप नंबर ४ स.नं.५१७, ज्ञानदा हौसिंग सोसायटी,ज्ञानप्रबोधिनी जवळ सदाशिव पेठ, पुणे-४११०३० यांनी एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्टमध्ये डायलेसिसकरीता प्रति रुग्ण रक्कम रूपये ४००/– (विना कन्ज्युमेबल्स ) प्रमाणे दर आकारून डायलेसिस करणेस,

४. इको सेल्स , शॉप नंबर ४ स.नं.५१७, ज्ञानदा हौसिंग सोसायटी,ज्ञानप्रबोधिनी जवळ सदाशिव पेठ, पुणे-४११०३० यांचेकडून सदरचा डायलेसिस प्रकल्प पाच (५ ) वर्ष चालविण्याकरीता आवश्यक तो करारनामा करणेस व सदर करारातील कुठल्याही बाबतीत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस,

विषय क्रमांक :– ९५० त्वर्य

मे.औद्योगिक न्यायालय, पुणे आणि मे.उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशाचे पालन करणेसाठी तक्रारदार माजी सैनिकांच्या बहुउद्देशिय पथकात सुपरवायझर व सहाय्यक यांना एक दिवसाचा सेवाखंड देऊन करार पध्दतीने सहा महिने कालावधीसाठी सेवा घेणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सुरक्षा/५७४ दि.११/१/२०२१ चे पत्र.

१. कार्यालय परिपत्रक जा.क्र.मआ/उपआ(ज)/६७०, दि.०३/०१/२००४ मधील बाबी प्रमाणे कार्यवाही न करणेस, आणि

२. परिशिष्ठ अ मधील क्र.२ श्री. सर्जेराव बजरंग शेंडगे, क्र.६ श्री.दिलीप दशरथ गायकवाड, क्र.१० श्री.अशोक शिवाजी सावंत, क्र.१५ श्री.सुरेश जयराम चव्हाण, क्र.१८ श्री.साहेबराव नारायण खुटवड, क्र.२० श्री.उत्तम जगन्नाथ भोसले, क्र.२२ श्री.जालिंदर भाऊ नागवडे, क्र.२८ श्री.धनाजी दत्तात्रय मोहिते, क्र.३० श्री.बाळासाहेब सदाशिव कनाळे, क्र.३३ श्री.निगाप्पा सिद्राप्पा हडपद, क्र.३४ श्री.भारत कुंडलिक ठुबे, क्र.३५ श्री.रामाप्पा दुंडाप्पा पटोळी, क्र.४० श्री.बाळासाहेब विष्णू जाधव, क्र.४३ श्री.उद्धव सिताराम गायकवाड, क्र.४४ श्री.उमाकांत बापू दिवटे, क्र.४६ श्री.आत्माराम लक्ष्मण आवळे, क्र.४७ श्री.भास्कर नारायण दामले, क्र.५४ श्री.रमेश कृष्णाजी चव्हाण, क्र.५५ श्री. भागवत मुकुंदराव मोटे, क्र.५७ श्री.दत्तात्रय लक्ष्मण सापते, क्र.५९ श्री.तुकाराम विठ्ठल डामसे, क्र.६१ श्री.विठ्ठल अप्पाजी साकोरे आणि क्र.६४ श्री.अरुण देवप्पा मुसळे, क्र.६६ श्री.शामराव श्रीरंग सुर्यवंशी, क्र.६७ श्री.दत्तात्रय अनंतराव देवकर या २५ माजी सैनिकांचे नावे वगळून इतर ४६ माजी सैनिकांच्या बहुउद्देशिय पथकात सुपरवायझर व सहाय्यक या अस्थायी पदावर दि.१६/११/२०२० ते दि.१५/०५/२०२१ पर्यत सहा महिनेचे कालावधी करिता करार पध्दतीने किमान वेतन दरानुसार पुणे मनपाच्या विविध कार्यालयासाठी सेवा घेणेस,

३. दि.१६/११/२०२० पासून ते दि.३१/१२/२०२० पर्यत सुपरवायझर यांना दैनंदिन वेतन दर र.रु. ७४९=८१ आणि सहाय्यक यांना दैनंदिन वेतन दर र.रु. ७११=३५ आणि माहे जानेवारी २०२१ पासूनचे दर सुधारित झाल्यानंतर त्याप्रमाणे प्रतिदिन मान्य दरमहा किमान वेतन एकवट मोबदला अदा करणेस,

४. सुपरवायझर व सहाय्यक यांना सहा महिन्याच्या नियुक्ती कालावधीमध्ये गणवेश बिलापोटी प्रत्येकी रक्कम रु.१५००/– एकवेळ अदा करणेस,

५. सुपरवायझर व सहाय्यक यांना अ.क्र.३ ते ४ नुसार सहा महिने कालावधीसाठी आदा करावयाचे किमान वेतन व गणवेश भत्याची रक्कम सुरक्षा विभागाचे अंदाजपत्रक अर्थशिर्षक सन २०२०–२१ ‘‘सुरक्षा विभागासाठी बहुउद्देशिय कामगार पुरविणे RE11D130’’ वर खर्ची टाकणेस,

६. सुपरवायझर व सहाय्यक म्हणून सेवा घेतलेल्या माजी सैनिकाकडून त्यांच्या सेवेप्रित्यर्थ घेण्यात येणाऱ्या करारनाम्याची पूर्तता करुन घेणेस,

७. बहुउद्देशिय पथकातील सुपरवायझर व सहाय्यक म्हणून सेवा घेतलेल्या माजी सैनिकांवर मुख्य खातेप्रमुख म्हणून मा. मुख्य सुरक्षा अधिकारी यांचे नियंत्रण राहील तसेच त्यांची नेमणूक ज्या विभागाकडे कामकाजासाठी केली आहे, त्या विभागाचे मा.खातेप्रमुख यांनी प्रत्यक्ष नियंत्रण ठेवणेस,

८. सुपरवायझर व सहाय्यक म्हणून सेवा घेतलेल्या माजी सैनिकांना द्यावयाचे आज्ञापत्र मा. मुख्य सुरक्षा अधिकारी यांचे स्वाक्षरीने प्रसृत करणेस,

९. बहुउद्देशिय पथकातील सुपरवायझर व सहाय्यक यांचे कामाकाजामध्ये बदल करण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना राहील.

विषय क्रमांक :– ९५१ त्वर्य

सन २०२१–२०२२ या वर्षाचे मिळकतकराचे दरास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टॅक्स/५८३ दि.११/१/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ९५२ त्वर्य

प्रभाग क्र. १४ ब मधील कोमरेकर वस्ती ते महालेनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आकाश कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२६,७६,९५२=५० पेक्षा ६.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२५,१६,३३५=३५ पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रुपये३,०१,९६०=२४ असे एकूण र.रु. २८,१८,२९५=५९ व विशेष भाववाढ सुत्र (स्टार रेट) येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणारी रक्कमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/५८५ दि.११/१/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ९५३ त्वर्य

येरवडा कळस–धानोरी क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात विविध रस्त्यांवर पाणी पुरवठा वाहिनी/गॅस वाहिनी/वीज वाहिनी तसेच केबल खोदाईचे रिईनस्टेटमेंट करणे तसेच इतर तदनुषऐगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बी.एन.चव्हाण यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८९,२१,१७९/– पेक्षा ३४.७५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५८,२१,०६९=३० पर्यंत काम करुन घेणेस, अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,७०,५४१=४८ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ७,७७०/– पर्यंत काम करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/५८९ दि. १२/१/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ९५४ त्वर्य

ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालयांतर्गत एम.एन.जी.एल./महावितरण व इतर विभागामार्फत खोदाई करण्यात आलेल्या रस्त्यांचे पृष्ठभागावर रिइनस्टेटमेंट व इतर तदनुषंगिक विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बी.एन.चव्हाण यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८८,८९,४९१/– पेक्षा ३४.७५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५८,००,३९२=८८ पर्यंत काम करून घेणेस अधिक जीएसटी र.रुपये १०,६६,७३८=९२ पर्यंत अधिक रॉयल्टी र.रुपये ७,०६७/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ३६,४८८/– पर्यंत अधिक टेंडर अटी शर्तीतील डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/५९० दि. १२/१/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ९५५ त्वर्य

पुणे महानगरपालिकेकडील वाहनांना लागणारे सर्व प्रकारचे ऑईल व ग्रिस खरेदी करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.अपार इंडस्ट्रिज लि., पुणे यांचे एकच टेंडर आले (पु.ग.प.र.रु. ४३,७०,०२६=२० पेक्षा (–) ३.२५% ने कमी) असल्याने त्यांचेकडून एकूण र.रु. ४२,२८,०००=३५ पर्यंत जी.एस.टी. करासह खरेदी करणेस व त्यापोटी त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ई) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/५९१ दि. १२/१/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ९५६ त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या गॅस शवदाहिनीसाठी वार्षिक पद्धतीने एल.पी.जी.गॅस सिलेंडर पुरविणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विद्युत/५९२ दि.१२/१/२०२१ चे पत्र.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची (ड) प्रकरण ५ (२)२ अन्वये पुणे महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या गॅस शवदाहिनीसाठी वार्षिक पद्धतीने एल.पी.जी.गॅस सिलेंडर पुरविणे हे काम मे. श्री साई भारत गॅस बिबवेवाडी, पुणे व श्रीराम गॅस एजन्सी, सिंहगडरोड, पुणे यांचेकडून केंद्र सरकारच्या भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. या उत्पादक कंपनीच्या दरमहा बदलत्या बाजारभावापेक्षा र.रु. २५=०० प्रमाणे कमी र.रु. ३०.०० लाखापर्यंत १९ किलो ग्रॅम क्षमतेचे एल.पी.जी.गॅस सिलेंडर अंदाजे ७७५ नग प्रति महिना दि. १/१२/२०२० ते २८/२/२०२१ पर्यंत अथवा नविन प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत यापैकी जे प्रथम घडेल तोपर्यंत समप्रमाणात खरेदी करण्यास तसेच त्यानुसार त्यांच्याशी करारनामा करण्यास आणि त्यांनी पुरविलेल्या एल.पी.जी.गॅस सिलेंडर पोटी दरमहा बदलत्या बाजार भावापेक्षा र.रु. २५.०० कमी या दराने आदा करण्यास

(टिप :- भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि., हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लि., इंडियन ऑईल इत्यादी कंपनी भारत सरकारच्या उत्पादक कंपन्या असून त्यांचे दर संपुर्ण भारतात एकच राहणार आहे. शिवाय वेळोवेळी सदर दर संकेत स्थळावर प्रसिध्द केले जात असल्याने व निविदा दरापेक्षा सदर दर खुप कमी असल्याने आणि पुणे महानगरपालिकेचे कोणतेही नुकसान होत नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची (ड) प्रकरण ५ मधील कलम (२)२ अन्वये एल.पी.जी. गॅस सिलेंडर खरेदी करणे योग्य राहिल.)

विषय क्रमांक :- ९५७ त्वर्य

कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात विविध रस्त्यांवर पाणीपुरवठा वाहिनी/मलनि:सारण वाहिनी/गॅस वाहिनी तसेच केबल खोदाईचे रिइनस्टेटमेंट करणे तसेच इतर व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.रमेश मनोहर गुंड यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.७५,८८,९५१/- पेक्षा ३५.१०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४९,२५,२२९=२० पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रुपये ९,१०,६७४=१२ पर्यंत काम करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/५९३ दि. १२/१/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- ९५८ त्वर्य

मा.स्थायी समिती ठराव क्र. ९२८ दि. ०४/०९/२०१९. अन्वये कोथरुड स.नं.१५/४ व १६/१४ सि.स.नं.६८१, ६८२ येथील सोसायट्यांना असणारा प्रवेशमार्ग अरुंद असल्याने मुख्य रस्ता वालचंद हाऊसपासून आतील सोसायटीपर्यंत असणारा ६.०० मी. रुंदीचा रस्ता महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० (१) (ब) नुसार ९.०० मी. रुंद करणेबाबत मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/६०८ दि. १२/१/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- ९५९ त्वर्य

पाषाण पंपींग येथे ११ केव्ही व्हीसीबी पॅनल पुरविणे बसविणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.जे.व्ही.एस.इंजिनिअरींग यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,९९,७४२=७० पेक्षा २३.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ७६,००,८०४=४२ उपलब्ध रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/६०९ दि. १२/१/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- ९६० त्वर्य

वडगांव जलकेंद्र ते तळजाई पाईप लाईनचे व्हॉल्व्ह विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री स्वामी गोविंद कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु. ९५,७७,३०८=१६ (स्थापत्य कामे र.रु. ८५,५१,१६८/- + जी.एस.टी. १२% र.रु.१०,२६,१४०=१६) पेक्षा २.२५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ९३,६१,८१८=७३ (स्थापत्य कामे र.रु. ८३,५८,७६६=७२ + जी.एस.टी. १२% र.रु.१०,०३,०५२/-) सर्व करांसहित काम करणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/६११ दि. १२/१/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ९६१ त्वर्य

खडकवासला धरण ते पर्वती जलकेंद्र ३०३० मि.मी. व्यासाच्या पाईप लाईन विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री स्वामी गोविंद कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु. ९०,७५,८३९=३६ (स्थापत्य कामे र.रु. ८१,०३,४२८/– + जी.एस.टी. १२% र.रु.९,७२,४११=३६) पेक्षा २.२५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ८८,७१,६३२=९७ (स्थापत्य कामे र.रु. ७९,२१,१००=८७ + जी.एस.टी. १२% र.रु. ९,५०,५३२=१०) सर्व करांसहित काम करणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/६१२ दि. १२/१/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ९६२ त्वर्य

पुणे महानगरपालिका मध्ये नव्याने समाविष्ठ झालेल्या आंबेगाव खुर्द व आंबेगाव बुद्रुक या गावामध्ये विविध ठिकाणी पावसाळी लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.शिवस्वयंभू रियल्टर्स यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २२,३८,७१२/– पेक्षा १% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२२,१६,३२४=८८ पर्यंत काम करून घेणेस अधिक जीएसटी र.रुपये २,६८,६४५=४४ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये २२,८९७/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये १९,२६८/– अधिक टेंडर अटी शर्तीतील डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/५९५ दि. १२/१/२०२१ चे पत्र.

शिवाजी दौंडकर
प्रभारी नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.